prepp
Your Personal Exams Guide

MH SET 2011 PSYCHOLOGY PAPER 2 NOVEMBER 27, 2011 QUESTION PAPER

**NOV - 13211/II**

# PSYCHOLOGY
## Paper II
# मानसशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This question paper contains **Fifty (50)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. The Yerkes Dodson law states that :
   - (A) performance is a function of ability multiplied by motivation
   - (B) to obtain optimal performance high emotional arousal is the most appropriate for relatively simple tasks
   - (C) the third and final stage of general adaptation syndrome (in stress) is exhaustion
   - (D) autonomic nervous system works both as activating and controlling system

2. What is the sequence of stages of General Adaptation syndrome (GAS) to stress ?
   - (A) alarm, fight, equilibrium
   - (B) alarm, arousal, exhaustion
   - (C) alarm, resistance, exhaustion
   - (D) arousal, approach, satisfaction

1. यर्किस-डाड्सन नियमानुसार :
   - (A) कार्यनिष्पत्ती ही क्षमता आणि प्रेरणा यांच्या गुणाकारावर आधारित असते
   - (B) कमाल कार्यनिष्पत्ती साध्य करण्याकरिता तुलनेने सोप्या कामासाठी उच्च भावनिक जागरण उचित ठरते
   - (C) तणावातील सामान्य प्रतियोजन संलक्षणातील तिसरी व शेवटची स्थिती 'एक्झाशन' आहे
   - (D) सवायत्त चेता संस्था क्रिया प्रवर्तन आणि नियंत्रण ही दोन्ही कामे करते

2. तणावांच्या सामान्य प्रतियोजन संलक्षणाच्या अनुक्रमे पायऱ्या कोणत्या ?
   - (A) भयसूचकता—झुंज—समतोल
   - (B) भयसूचकता—कार्यप्रवणता—थकवा
   - (C) भयसूचकता—प्रतिरोध—थकवा
   - (D) कार्यप्रवणता—उपगम—समाधान

3. Which of the following psychologist's theory is the basis for the well known personality test MBTI ?

(A) Sigmund Freud

(B) Raymond Cattell

(C) Carl Jung

(D) James McKeen Cattell

4. The way to make punishment more effective is :

1. that punishment should immediately follow the behaviour it is meant to punish
2. using an aggressive type of punishment such as spanking
3. that punishment should be consistent
4. punishment by removal of favorite object

(A) 1 and 2

(B) 3 and 4

(C) 1 and 3

(D) 2 and 4

3. सर्वपरिचित 'एम्.बी.टी.आय' व्यक्मित्व चाचणी, कोणत्या मानसशास्त्रज्ञाच्या सिद्धांतावर आधारली आहे ?

(A) सिग्मंड फ्रॉइड

(B) रेमंड कॅटेल

(C) कार्ल युंग

(D) जेम्स् मक्कीन कॅटेल

4. शिक्षा अधिक परिणामकारक करण्याच्या पद्धतीत याचा समावेश असतो :

1. ज्या वर्तनाला शिक्षा करायची आहे त्यानंतर तत्काळ शिक्षा केली जावी
2. आक्रमक प्रकारची शिक्षा उपयोगात आणणे जसे फटका मारणे
3. शिक्षा देण्यात सातत्य असावे
4. आवडती वस्तू काढून घेऊन शिक्षा देणे

अचूक उत्तर निवडा :

(A) 1 आणि 2 फक्त

(B) 3 आणि 4 फक्त

(C) 1 आणि 3 फक्त

(D) 2 आणि 4 फक्त

www.prepp.in



5. Two most basic units of speech are :
   (A) Words and rules of grammar
   (B) Ideas and concepts
   (C) Morphemes and phonemes
   (D) Connotative and denotative meaning

6. Information that is *not* transferred from sensory to short term memory or from short term to long term memory is :
   (A) forgotten for ever
   (B) available for short duration
   (C) can be retrieved back with efforts within few hours
   (D) can be retrieved back if efforts are done immediately

7. In his well-known model of intelligence in the dimension of content, Guilford has included :
   1. figural
   2. relational
   3. symbolic
   4. memory
   (A) 1, 2 and 3 only
   (B) 2, 3 and 4 only
   (C) 1 and 3 only
   (D) 2 and 4 only

5. वाचेतील दोन मुलभूत घटक हे आहेत :
   (A) शब्द आणि व्याकरणाचे नियम
   (B) कल्पना आणि संकल्पना
   (C) मॉरफीम्स् आणि फोनीम्स्
   (D) कोनोटेटिव्ह आणि डीनोटेटिव्ह अर्थ

6. जी माहिती वेदनिक स्मृतीतून अल्पकालीन स्मृतीत वा अल्पकालीन स्मृतीतून दीर्घकालीन स्मृतीत साठविली जात **नाही** ती :
   (A) कायमची विस्मरणात जाते
   (B) अल्पकाळ उपलब्ध असते
   (C) काही तासांमध्ये प्रयत्नपूर्वक पुन्हा प्रत्यानयनाने मिळवता येते
   (D) जर त्वरीत प्रयत्न केले तर प्रत्यानयनाने परत मिळवता येते

7. गिलफोर्ड यांनी त्यांच्या बुद्धिमत्तेच्या सुप्रसिद्ध प्रारूपातील आशय (कंटेट), या भागात कोणत्या गोष्टींचा समावेश केला आहे ?
   1. आकृतीविषयक
   2. संबंधविषयक
   3. प्रतिकात्मक
   4. स्मृतीविषयक
   (A) 1, 2 व 3 फक्त
   (B) 2, 3 व 4 फक्त
   (C) 1 व 3 फक्त
   (D) 2 व 4 फक्त

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



8. According to Eysenck's biologically based personality theory. Extraversion is directly related to :

(A) Sympathetic Nervous System

(B) Peripheral Nervous System

(C) Parasympathetic Nervous System

(D) Central Nervous System

9. Spearman C.E.B. is known for his work on :

1. fundamental ideas of factor analysis

2. two factor theory of intelligence

3. individual group factors of intelligence

4. rank correlation

(A) 1, 2 and 4 only

(B) 2, 3 and 4 only

(C) 1 and 2 only

(D) All of the above

8. आयझेंकच्या जीवशास्त्रावर आधारित व्यक्तिमत्त्व सिद्धांतानुसार बहिर्मुखता ही खालीलपैकी कशाशी थेटरित्या संबंधीत आहे ?

(A) अनुकंपी चेतासंस्था

(B) सीमावर्ती चेतासंस्था

(C) परानुकंपी चेतासंस्था

(D) मध्यवर्ती चेतासंस्था

9. सी. इ. बी. स्पिअरमन हे त्यांच्या कोणत्या कामासाठी प्रसिद्ध आहेत ?

1. घटक विश्लेषणाविषयी मूलभूत कल्पना

2. बुद्धिमत्तेचा द्विघटकीय सिद्धांत

3. बुद्धिमत्तेचे व्यक्तिगत समूह घटक

4. गुणानुक्रम सहसंबंध

अचूक उत्तर निवडा

(A) 1, 2 आणि 4 फक्त

(B) 2, 3 आणि 4 फक्त

(C) 1 आणि 2 फक्त

(D) वरीलपैकी सर्व

Prepp
Your Personal Exams Guide



10. Match List I with List II and select the correct answer using the codes given below the lists :

| **List I (Research Method)** | **List II (Weakness)** |
|---|---|
| P. Case study | 1. Findings may not be fully generalizable to real life |
| Q. Experimental Method | 2. Participants' responses can be influenced by socially desirable answers |
| R. Observation | 3. Not suitable to study a very large number of subjects |
| S. Survey | 4. Inferences can be unreliable due to bias of the data collector |

*Codes* :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (A) | P-1 | Q-3 | R-4 | S-2 |
| (B) | P-3 | Q-1 | R-2 | S-4 |
| (C) | P-1 | Q-3 | R-2 | S-4 |
| (D) | P-3 | Q-1 | R-4 | S-2 |

11. On a particular psychological test with norms in terms of T scores (mean = 50, SD = 10), a subject had a T score of 40. What would be his/her percentile rank ?

(A) 16 (B) 34
(C) 56 (D) 84

10. सूची I व II यांच्या जोड्या लावा आणि खालील संकेतन वापरून उत्तर द्या :

| **सूची I (संशोधन पद्धत)** | **सूची II (त्रुटी)** |
|---|---|
| P. व्यक्तिवृत्त अभ्यास | 1. शोधांचे खऱ्या जीवनाशी सामान्यीकरण करणे अवघड जाते |
| Q. प्रायोगिक पद्धती | 2. सहभाग्यांच्या अनुक्रियांवर सामाजिक वांछनीयतेचा परिणाम होऊ शकेल |
| R. निरीक्षण | 3. मोठ्या संख्येत प्रयुक्तांचा अभ्यास शक्य होत नाही |
| S. सर्वेक्षण | 4. प्रदत्त संकलकाच्या पूर्वग्रहामुळे अनुमान अविश्वसनीय होईल |

**संकेत :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (A) | P-1 | Q-3 | R-4 | S-2 |
| (B) | P-3 | Q-1 | R-2 | S-4 |
| (C) | P-1 | Q-3 | R-2 | S-4 |
| (D) | P-3 | Q-1 | R-4 | S-2 |

11. एका विशिष्ट मानसशास्त्रीय चाचणीसाठी टी-श्रेणीचे (मध्यमान = 50, प्रमाण विचलन = 10) मानदंड आहेत. प्रयुक्ताचा टी-गुणांक 40 असेल, तर त्याचा शतमकी गुणानुक्रम किती असेल ?

(A) 16 (B) 34
(C) 56 (D) 84

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



12. Eidetic memory can store :
    (A) vivid visual images
    (B) vivid visual and auditory images
    (C) visual, auditory and tactile sensations
    (D) visual images with exact semantic association

13. Rensink's coherence theory can explain change blindness using the following sequence of events.
    1. Unstable representations extending across visual field
    2. Newer stimuli at same location take their place
    3. Focussed attention produces detailed and longlasting impression of one object
    4. When focussed attention removed from object, representation disintegrates and returns to pre-focus stage

    *Correct sequence :*
    (A) 3, 4, 2, 1
    (B) 4, 3, 1, 2
    (C) 1, 2, 3, 4
    (D) 2, 1, 4, 3

12. आयडेटिक मेमरीमध्ये याची साठवण होते :
    (A) स्पष्ट दृक् प्रतिमा
    (B) स्पष्ट दृक् आणि श्राव्य प्रतिमा
    (C) दृक्, श्राव्य व स्पर्शसंबंधी प्रतिमा
    (D) दृक् प्रतिमा आणि त्यांचे अचूक अर्थविषयक साहचर्य

13. रेनसिंकच्या कोहीरन्स् थिअरीच्या आधारे चेंज ब्लाइंडनेस्ची कारणे खालील क्रमाने आढळतात.
    1. दृष्टिक्षेत्रावरील अस्थिर चित्रीकरण
    2. त्याच ठिकाणी आढळणारे नवीन उद्दीपक पहिल्यांची जागा व्यापतात
    3. लक्ष केंद्रित केल्यावर एकाच वस्तूचे सविस्तर व दीर्घकालीन संस्करण निर्माण होते
    4. जेव्हा लक्ष काढून घेतले जाते, वस्तू प्रत्यभिज्ञान तुटक होते व आधीच्या टप्प्यावर स्थिरावते.

    **योग्य क्रम :**
    (A) 3, 4, 2, 1
    (B) 4, 3, 1, 2
    (C) 1, 2, 3, 4
    (D) 2, 1, 4, 3

www.prepp.in



14. Match List I with List II and indicate your answer using the codes given below the lists :

| List I (Personality Dimension) | List II (Measuring instrument) |
|---|---|
| P. Openness to experience | 1. EPQ-R |
| Q. Psychoticism | 2. TAT |
| R. Anxiety | 3. NEO-PI-R |
| S. Achievement motivation | 4. STAI |

***Codes :***

| | P | Q | R | S |
|---|---|---|---|---|
| (A) | 1 | 3 | 2 | 4 |
| (B) | 3 | 1 | 2 | 4 |
| (C) | 1 | 3 | 4 | 2 |
| (D) | 3 | 1 | 4 | 2 |

15. Match the terms related to attention with their descriptions, from the two lists :

| List I (Attention related terms) | List II (Description) |
|---|---|
| P. Selective attention | 1. Search for combinations of features and missing features |
| Q. Divided attention | 2. Concentration of mental activity |
| R. Spontaneous attention | 3. Multiple stimuli with instructions to attend to all |
| S. Focussed attention | 4. Response to one among multiple stimuli |

(A) P-1 Q-2 R-4 S-3
(B) P-4 Q-3 R-2 S-1
(C) P-2 Q-1 R-3 S-4
(D) P-3 Q-4 R-1 S-2

14. सूची I व II यांच्या जोड्या लावा आणि खालील संकेत वापरून उत्तर द्या :

| सूची I (व्यक्तिमत्त्व आयाम) | सूची II (मापन चाचणी) |
|---|---|
| P. ओपननेस टु एक्स्पिरियन्स | 1. EPQ-R |
| Q. सायकॉटीसिझ्म | 2. TAT |
| R. अँङ्झायटी | 3. NEO-PI-R |
| S. संपादन प्रेरणा | 4. STAI |

**संकेत :**

| | P | Q | R | S |
|---|---|---|---|---|
| (A) | 1 | 3 | 2 | 4 |
| (B) | 3 | 1 | 2 | 4 |
| (C) | 1 | 3 | 4 | 2 |
| (D) | 3 | 1 | 4 | 2 |

15. सूची I व II यांच्या जोड्या लावा आणि खालील संकेतन वापरून उत्तर द्या :

| सूची I (अवधान प्रकार) | सूची II (वर्णन) |
|---|---|
| P. सिलेक्टिव्ह अटेंशन | 1. मुखांगांचा शोध |
| Q. डिव्हायडेड अटेंशन | 2. मानसिक कार्याचे संहतीकरण |
| R. स्पॉन्टेनियस अटेंशन | 3. अनेक उद्दीपकांकडे लक्ष देण्याची सूचना |
| S. फोकस्ड अटेंशन | 4. अनेक उद्दीपकांपैकी एकांवर लक्ष केंद्रित |

(A) P-1 Q-2 R-4 S-3
(B) P-4 Q-3 R-2 S-1
(C) P-2 Q-1 R-3 S-4
(D) P-3 Q-4 R-1 S-2

www.prepp.in



16. Delay of free recall filled with some mental activity :
   (A) decreases recency but not primacy
   (B) decreases primacy but not recency
   (C) decreases both primacy and recency
   (D) improves performance of middle part of list

17. Information-processing theory includes :
   1. perception and learning
   2. attention and thinking
   3. meaning and perception
   4. thinking and learning
   (A) 1 and 2 only
   (B) 1, 2, 3 and 4
   (C) 3 and 4 only
   (D) 4 only

18. Fluency, Flexibility and Originality would be the most characteristic of which type of thought ?
   (A) Convergent thinking
   (B) Mechanical thinking
   (C) Rote problem solving
   (D) Divergent thinking

16. एखाद्या मानसिक क्रियेने विलंबित केलेले मुक्त प्रत्यावाहन :
   (A) सन्निधकालीन स्मृती कमी करते पण प्राथम्यता स्मृती कमी करत नाही
   (B) प्राथम्यता कमी करते पण सन्निधकालीन स्मृती कमी करत नाही
   (C) प्राथम्यता व सन्निधकालीन या दोन्ही स्मृती कमी करते
   (D) यादीतील मधल्या भागा संबंधी स्मृती सुधारते

17. माहिती प्रक्रिया सिद्धांता मध्ये हे येते :
   1. संवेदन आणि अध्ययन
   2. अवधान आणि विचार
   3. अर्थ आणि संवेदन
   4. विचार आणि अध्ययन
   (A) 1 आणि 2 फक्त
   (B) 1, 2, 3 आणि 4
   (C) 3 आणि 4 फक्त
   (D) 4 फक्त

18. अस्खलितता, लवचिकता आणि मुलभूतता कोणत्या विचारप्रकाराची महत्त्वाची वैशिष्ट्ये ठरतात ?
   (A) संलक्षी विचार
   (B) यांत्रिक विचार
   (C) घोकंपट्टीने समस्या समाधान
   (D) बहुलक्षी विचार

www.prepp.in



19. Stages of problems solving are :
    (A) Preparation, incubation and illumination
    (B) Incubation, preparation and hypothesis
    (C) Preparation, illumination and incubation
    (D) Incubation, illumination and production

20. Short term memory :
    1. retains new information for brief time
    2. holds information retrieved from long term memory
    3. provides mental scratchpad
    4. carries out tasks
    (A) 1, 2 and 4 only
    (B) 1, 3 and 4 only
    (C) 2, 3 and 4 only
    (D) all of the above

21. The opponent-process theory of motivation takes :
    (A) a hedonistic view of motivation
    (B) a view that behaviour is pushed towards goal by driving states within the person
    (C) a view that the goal objects pull behaviour towards them
    (D) a view that motives are composed of emotions, arousal and thinking

19. समस्या समाधानाच्या पायऱ्या या आहेत :
    (A) पूर्वतयारी, अंत:पोषण आणि दीपन
    (B) अंत:पोषण, पूर्वतयारी आणि अभ्युपगम
    (C) पूर्वतयारी, दीपन आणि अंत:पोषण
    (D) अंत:पोषण, दीपन आणि सृजन

20. अल्पकालीन स्मृती :
    1. नवीन माहिती अल्पकाल साठवून ठेवते
    2. दीर्घकालीन स्मरणातून प्रत्यानयनाने मिळवलेली माहिती साठवून ठेवते
    3. मानसिक कच्चे काम वही पुरवते
    4. काम पूर्ण करते
    (A) 1, 2 आणि 4 फक्त
    (B) 1, 3 आणि 4 फक्त
    (C) 2, 3 आणि 4 फक्त
    (D) वरीलपैकी सर्व

21. प्रेरणेची विरोधक-प्रक्रिया उपपत्ती :
    (A) सुखवादात्मक दृष्टिकोन बाळगते
    (B) व्यक्तीमधील चालक स्थिती ध्येयप्राप्तीकडे वर्तनाला ढकलित असते, असे प्रतिपादते
    (C) ध्येय वस्तु वर्तनाला स्वत:कडे आकृष्ठ करते असा दृष्टिकोन बाळगते
    (D) प्रेरणा या भावना, कार्यप्रवणता आणि विचार यांनी परिपुष्ट असतात असे सांगते

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



22. Prosopagnosia is the loss of :
    (A) depth perception
    (B) colour perception
    (C) face recognition
    (D) size judgement

23. Berry's model of contexts of intelligence includes :
    (A) Biological and social context
    (B) cognitive and phenomenal context
    (C) cognitive, social and genetic context
    (D) performance, experiential and ecological context

24. In hierarchical theory of intelligence, top of the pyramid is :
    (A) G or general intelligence
    (B) S or specific abilities
    (C) Primary mental abilities
    (D) Creativity

22. प्रोसोपॅग्नोसिया म्हणजे, ह्या संवेदनातील त्रुटी होय :
    (A) घनता संवेदन
    (B) रंग संवेदन
    (C) चेहरा ओळख
    (D) आकाराचा अंदाज

23. बेरी यांच्या बुद्धिमत्तेच्या संदर्भासंबंधीच्या प्रारूपामध्ये याचा समावेश आहे :
    (A) जीवशास्त्रीय व समाजशास्त्रीय संदर्भ
    (B) बोधात्मक व प्रत्ययी संदर्भ
    (C) बोधात्मक, सामाजिक व जननिक संदर्भ
    (D) कृतिविषयक, अनुभवविषयक व परिस्थितीविषयक संदर्भ

24. श्रेणीविषयक बुद्धिमत्ता सिद्धांतात मनोऱ्याच्या वरच्या भागात :
    (A) जी वा सर्वसाधारण बुद्धिमत्ता असते
    (B) एस वा विशिष्ट क्षमता असतात
    (C) प्राथमिक बौद्धिक क्षमता असतात
    (D) सर्जनशीलता असते

www.prepp.in



25. Which of the following terms is closely associated with achievement motivation ?
    (A) Fear of failure
    (B) Attractiveness of reward
    (C) Self-actualization
    (D) Bounded rationality

26. "Big Five" theory of personality represents which of the following approaches ?
    (A) Nomothetic
    (B) Ideographic
    (C) Longitudinal
    (D) Psychographic

27. Which one of the following best explains why stress increases a person's vulnerability to infections by bacteria and viruses ?
    (A) It reduces the activity level of a person
    (B) It reduces the number of white blood cells
    (C) It speeds up hardening of the arteries
    (D) It triggers a release of digestive acids

25. खालीलपैकी कोणती संज्ञा उपलब्धी प्रेरणेशी संबंधित आहे ?
    (A) अपयशाची भीती
    (B) पारितोषकाची आकर्षकता
    (C) आत्मवास्तविकीकरण
    (D) सीमित तार्किकता

26. व्यक्तिमत्त्वाचा ''बिग फाइव्ह'' दृष्टिकोन खालीलपैकी कोणत्या दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करतो ?
    (A) नियमसापेक्ष
    (B) व्यक्तिसापेक्ष
    (C) अनुकालिक
    (D) मानसरेखनशास्त्र

27. बॅक्टेरिया आणि विषाणुंच्या बाबतीत व्यक्तीची तणावामुळे भेद्यता वाढते याचे खालीलपैकी कोणते विधान उत्तम स्पष्टीकरण देते ?
    (A) व्यक्तीची कार्यप्रवण पातळी कमी होते
    (B) व्यक्तीच्या श्वेत रक्तपेशी कमी होतात
    (C) धमन्यांची काठिण्यता वाढविते
    (D) पाचक आम्लाला उद्दिपित करते

www.prepp.in



28. To make punishment most effective, it should be :

(A) very intense

(B) applied every other time the bad behaviour occurs

(C) an aggressive type, such as spanking

(D) paired with reinforcement of the correct behaviour

29. When one conditioned stimulus is used to create another, it is called :

(A) forward conditioning

(B) chaining

(C) higher-order conditioning

(D) shaping

30. Rorschach test can be administered using the following sequence :

1. Measurement of total time
2. Measurement of reaction time
3. Enquiry
4. Free association

Correct sequence is :

(A) 1, 2, 3, 4

(B) 4, 3, 2, 1

(C) 2, 1, 4, 3

(D) 4, 2, 1, 3

28. शिक्षा जास्त परिणामकारक करायची असेल तर ती कशी असायला हवी ?

(A) अतिशय तीव्र

(B) अप्रिय वर्तन घडल्यानंतर दर दुसऱ्या वेळेला दिली जावी

(C) आक्रमक प्रकारची, उदाहरणार्थ चापटी मारणे

(D) योग्य वागणुकीसाठी प्रबलक, त्याच वेळी, म्हणजे शिक्षेबरोबरच, दिला जातो

29. एका अभिसंधित उद्दीपकाचा उपयोग, आणखी एक उद्दीपक निर्माण करण्यासाठी वापरला जातो, तेव्हा त्याला असे संबोधतात :

(A) पुरोगामी अभिसंधान

(B) शृंखलीकरण

(C) उच्चश्रेणीय अभिसंधान

(D) आकारण

30. रॉर्शाक चाचणी देताना ह्या क्रमाने काम केले जाते :

1. संपूर्ण वेळाचे मापन
2. प्रतिक्रिया कालाचे मापन
3. विचारणा
4. स्वैर साहचर्य

योग्य क्रम निवडा.

(A) 1, 2, 3, 4

(B) 4, 3, 2, 1

(C) 2, 1, 4, 3

(D) 4, 2, 1, 3

www.prepp.in



**Questions 31 to 33 :** Read the following paragraph and answer the questions below it.

**Paragraph :** A researcher hypothesized that there is no association between the faculty to which the student belongs and his/her communication skills. A random sample of 400 students from three faculties—Arts, Science and Commerce was drawn. Each student was assessed on the communication skills and was classified into three categories—with poor communication skills, with adequate communication skills, and with excellent communication skills. The 3 × 3 contingency table was formed and analyzed by the chi-square test. The chi-square value turned out to be significant at .01 level.

31. What would be the degrees of freedom for the above chi-square ?

(A) 3 (B) 4

(C) 6 (D) 9

**प्रश्न 31 ते 33 :** खालील परिच्छेद वाचा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे द्या :

**परिच्छेद :** एका संशोधकाने असा अभ्युपगम मांडला की विद्यार्थ्यांची विद्याशाखा व त्याची/तीची संभाषण कौशल्ये यात संबंध नाही. कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमधून 400 विद्यार्थ्यांचा यादृच्छिक नमुना निवडण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्याचे संप्रेषण कौशल्याचे मापन करून तीला पुढील तीन गटांमध्ये विभागण्यात आले—निम्न संप्रेषण कौशल्ये, पुरेशी संप्रेषण कौशल्ये व उत्तम संप्रेषण कौशल्ये. 3 × 3 चे आनुषंगिकता कोष्टक बनविण्यात आले व काय स्क्वेअर चाचणीद्वारा विश्लेषण केले गेले. मिळालेला काय स्क्वेअर हा .01 पातळीवर संख्याशास्त्रीय लक्षणीयता दर्शवितो :

31. वरील काय स्क्वेअरसाठी मुक्ति प्रमाणसंख्या किती आहे ?

(A) 3 (B) 4

(C) 6 (D) 9

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



32. In one of the cell of the above contingency table, the obtained and expected frequencies were 50 and 40 respectively. What would be the contribution of this cell towards the total chi-square value ?

(A) 2.00

(B) 2.50

(C) 6.25

(D) 10.00

33. From the above data, it can be concluded that the :

(A) researcher's hypothesis is verified

(B) researcher's hypothesis is partially verified

(C) researcher's hypothesis is rejected

(D) insufficient data for verifying researcher's hypothesis

32. वरील आनुषंगिकता कोष्टकाच्या एका सेलमध्ये प्राप्त व आपेक्षित वारंवारिता ह्या अनुक्रमे 50 व 40 आहेत. या सेलचे काय स्क्वेअरच्या एकूण मूल्यांत काय योगदान आहे ?

(A) 2.00

(B) 2.50

(C) 6.25

(D) 10.00

33. वरील प्रदत्तावरून असा निष्कर्ष काढता येतो की :

(A) संशोधकाच्या अभ्युपगमाची पडताळणी झाली

(B) संशोधकाच्या अभ्युपगमाची आंशिक पडताळणी झाली

(C) संशोधकाचा अभ्युपगम नाकारला गेला

(D) संशोधकाचे अभ्युपगम पडताळणीसाठी पुरेसे प्रदत्त नाहीत

www.prepp.in



**Questions 34 to 37** : In the following questions, each question has two statement—Assertion (A) and Reason (R). Read each question carefully and decide whether Assertion and Reason are individually correct or not, and if they are correct, whether the Reason is a valid explanation of the Assertion. For each question, before the corresponding question number, indicate your answer using the following codes :

(A) Both A and R are true and R is the correct explanation of A

(B) Both A and R are true but R is NOT the correct explanation

(C) A is true but R is false

(D) A is false but R is true

34. **Assertion (A)** : In akinetopsia, objects in motion cannot be perceived although stationery objects are perceived.

**Reason (R)** : MT area or V 5 are specialised for motion detection and perception.

**प्रश्न 34 ते 37** : खालील प्रश्नांमध्ये प्रत्येक प्रश्नात दोन वाक्ये आहेत — विधान (Assertion or A) व कारण (Reason or R). प्रत्येक प्रश्न काळजीपूर्वक वाचा. विधान आणि कारण स्वतंत्रपणे बरोबर आहेत की नाही ते ठरवा, आणि ती बरोबर असतील तर कारण हे विधानाचे यथार्थ स्पष्टीकरण आहे का ते ठरवा. प्रत्येक प्रश्नासाठी, त्याच्या योग्य प्रश्नक्रमांकासमोर, खालील संकेतन वापरून आपले उत्तर दर्शवा.

(A) विधान (A) व कारण (R) दोन्ही सत्य आहेत व कारण (R) हे विधानाचे योग्य स्पष्टीकरण आहे.

(B) विधान (A) व कारण (R) दोन्ही सत्य आहेत पण कारण (R) हे बरोबर स्पष्टीकरण नाही.

(C) विधान (A) सत्य आहे पण कारण (R) चूक आहे.

(D) विधान (A) चूक आहे पण कारण (R) सत्य आहे

34. **विधान** (A) : एकायनोपसियामध्ये, अचल वस्तू दिसतात, पण हलणाऱ्या वस्तूंचे संवेदन होत नाही

**कारण** (R) : एम्. टी. अथवा व्ही 5 ह्या प्रभागांना हालचालीच्या ओळखीसाठी व संवेदनासाठी विशेष क्षमता असते.

www.prepp.in



35. **Assertion (A)** : In case of visual sensory memory even when exposure time increases from 50 milliseconds to 500 milliseconds, performance in whole report method does not increase.

**Reason (R) :** Information loss takes place in sensory memory by the time individual reports first few letters.

36. **Assertion (A)** : Larger group differences in performance are found in case of performance and other nonverbal intelligence tests than verbal intelligence tests.

**Reason (R) :** Non-language tests may be more culturally loaded than language based intelligence tests.

35. **विधान** (A) : दृक् वेदनिक स्मृतीमध्ये जरी अनावरण काल 50 मिलीसेकंदांपासून 500 मिली सेकंदांपर्यंत वाढवला, तरी पूर्ण अहवाल पद्धतीत कार्यात फरक पडत नाही

**कारण** (R) : वेदनिक स्मृतीत व्यक्ती पहिली काही अक्षरे सांगेपर्यंत माहिती नष्ट होते.

36. **विधान** (A) : शाब्दिक बुद्धिमत्ता चाचण्यांपेक्षा कृतीप्रवण व अन्य अशाब्दिक चाचण्यांमध्ये समूहांच्या कार्यात जास्त फरक आढळतो.

**कारण** (R) : भाषिक बौद्धिक चाचण्यांपेक्षा अभाषिक चाचण्या सांस्कृतिकदृष्ट्या अधिक प्रभावित असतात.

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



37. **Assertion (A)** : Usually, state anxiety scores, as compared to trait anxiety scores, have less test-retest reliability.

**Reason (R)** : State anxiety usually fluctuates over time.

38. The following techniques can be used to study function in a living human brain :

1. Functional Magnetic Resonance Imaging
2. Ablation and Lessoning
3. Stereotaxic procedures
4. Computerized tomography

(A) 1 and 4 only

(B) 2, 3 and 4 only

(C) 1, 3 and 4 only

(D) 1 and 3 only

39. Analytical thinking :

(A) means breaking down a problem into identifiable units

(B) must lead to a proper decision

(C) follows creativity

(D) follows problem solving

37. **विधान** (A) : गुणचिंतेच्या प्राप्तांकांच्या तुलनेत, अवस्था चिंतेच्या प्राप्तांकांची चाचणी-पुनर्चाचणी विश्‍वसनियता सामान्यत: कमी असते.

**कारण** (R) : आवस्था चिंता ही वेळोवेळी बदलत असते.

38. जिवंत मेंदूची क्रिया अभ्यासण्यासाठी खालील पद्धतींचा वापर होतो :

1. फंक्शनल मॅग्नेटिक रेझोनन्स् इमेजिंग
2. ॲब्लेशन् एँड लीझनिंग
3. स्टीरिओटॅक्सिक् प्रोसीड्यूअरस्
4. कॉम्प्यूटराइझ्ड टोमोग्राफी

अचूक उत्तर निवडा :

(A) 1 आणि 4 फक्त

(B) 2, 3 आणि 4 फक्त

(C) 1, 3 आणि 4 फक्त

(D) 1 आणि 3 फक्त

39. विश्‍लेषणात्मक चिंतन प्रक्रिया म्हणजे :

(A) समस्येचे ओळखता येण्याजोगे भाग करणे

(B) योग्य निर्णयाप्रत नेले पाहिजे

(C) सृजनात्मकतेमागून येते

(D) समस्या समाधानामागून येते

www.prepp.in

prepp Your Personal Exams Guide



40. Match List I with List II and answer using the code given below :

| List I (Concept) | List II (Theorists associated) |
|---|---|
| P. Aggressive Instinct | 1. Miller and Dollard |
| Q. Needs hierarchy | 2. Freud |
| R. Achievement motivation | 3. Maslow |
| S. Frustration aggression hypothesis | 4. Mc Clelland |

**Codes :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (A) | P-2 | Q-3 | R-1 | S-4 |
| (B) | P-3 | Q-2 | R-1 | S-4 |
| (C) | P-3 | Q-2 | R-4 | S-1 |
| (D) | P-2 | Q-3 | R-4 | S-1 |

40. सूची I व सूची II यांच्या जोड्या लावा आणि खालील संकेतन वापरून उत्तर लिहा :

| सूची I (संकल्पना) | सूची II (अभ्यासक) |
|---|---|
| P. आक्रमक सहजप्रवृत्ती | 1. मिलर आणि डॉलर्ड |
| Q. गरज अधिश्रेणी | 2. फ्रॉइड |
| R. संपादन प्रेरणा | 3. मॅस्लो |
| S. वैफल्य-आक्रमण अभ्युपगम | 4. मक् क्लेलांड |

**संकेत :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (A) | P-2 | Q-3 | R-1 | S-4 |
| (B) | P-3 | Q-2 | R-1 | S-4 |
| (C) | P-3 | Q-2 | R-4 | S-1 |
| (D) | P-2 | Q-3 | R-4 | S-1 |

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



41. In brain imaging by PET :

1. positrons emitted by a radioactive substance are captured by a scanner
2. the more active a brain area is, the more is the substance absorbed
3. radioactive substance is injected into the bloodstream
4. color coded image is formed with red showing greatest activity followed by yellow, green then blue

Indicate the correct sequence :

(A) 1, 2, 3, 4

(B) 3, 2, 1, 4

(C) 4, 2, 1, 3

(D) 3, 4, 2, 1

41. PET तंत्राने ब्रेन-इमेजिंग करतांना :

1. रेडिओऍक्टिव्ह पदार्थाद्वारे उत्सर्गित पॉझिट्रोनची स्कॅनमुळे नोंद होते
2. मेंदूचा जो विभाग जास्त क्रियाशील असतो, तेथे जास्त पदार्थ जिरतो
3. रेडिओऍक्टिव्ह पदार्थ सुईद्वारे रक्तात दाखल केला जातो
4. रंगाने निदर्शित असे चित्र निर्माण होते, ज्यात लाल म्हणजे सर्वात क्रियाशील, मग पिवळा, मग हिरवा आणि निळा सगळयात कमी प्रक्रिया दर्शवणारा.

योग्य क्रम लावा :

(A) 1, 2, 3, 4

(B) 3, 2, 1, 4

(C) 4, 2, 1, 3

(D) 3, 4, 2, 1

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



42. Reliability indicates the ratio :

(A) True variance/Error variance

(B) Observed variance/Error variance

(C) True variance/Observed variance

(D) Observed variance/True variance

43. A beam is passed through a thin slice of tissue into photographic film. Different parts of the tissue block or pass the beam to a different degree, and an image is produced. This describes the working of :

(A) a laboratory microscope

(B) a physiological microscope

(C) a scanning microscope

(D) an electron microscope

42. विश्वसनियता पुढील गुणोत्तर दर्शविते :

(A) सत्य प्रचरण/अपलक्ष्यांक प्रचरण

(B) प्राप्त प्रचरण/अपलक्ष्यांक प्रचरण

(C) सत्य प्रचरण/प्राप्त प्रचरण

(D) प्राप्त प्रचरण/सत्य प्रचरण

43. पातळ उतीमधून प्रकाशकिरणे जातात व फोटोग्रॅफिक फिल्मवर पडतात. उतीचा वेगवेगळा भाग निरनिराळ्या प्रमाणात प्रकाशकिरण अडवतो, व चित्र निर्माण होते. हे कोणत्या यंत्राचे वर्णन आहे ?

(A) लॅबोरेटरी मायक्रोस्कोप

(B) फिझिऑलोजिकल् मायक्रोस्कोप

(C) स्कॅनिंग मायक्रोस्कोप

(D) इलेक्ट्रोन मायक्रोस्कोप

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



44. Match the type of reinforcement schedule with its definition :

| List I (Definition) | List II (Schedule) |
|---|---|
| P. Reinforcement occurs after a set time period | 1. Fixed ratio |
| Q. The organism is rewarded after is certain number of correct responses | 2. Fixed interval |
| R. The organism is rewarded after every response | 3. Variable ratio |
| S. Reinforcement occurs after a varying number of responses | 4. Continuous reinforcement |

*Codes* :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (A) | P-2 | Q-1 | R-4 | S-3 |
| (B) | P-1 | Q-2 | R-3 | S-4 |
| (C) | P-3 | Q-4 | R-2 | S-1 |
| (D) | P-4 | Q-3 | R-1 | S-2 |

44. सूची I व सूची II यांच्या जोड्या लावा आणि खालील संकेतन वापरून उत्तर द्या :

| सूची I (व्याख्या) | सूची II (प्रबलन कार्ययोजनालेख) |
|---|---|
| P. ठराविक वेळानंतर प्रबलन होते | 1. स्थिर गुणोत्तर |
| Q. ठराविक योग्य अनुक्रियेनंतर जीवाला प्रबलन मिळते | 2. स्थिर कालांतरी |
| R. प्रत्येक अनुक्रियेनंतर जीवाला प्रबलन मिलते | 3. परिवर्तनीय गुणोत्तर |
| S. अनिश्चित अनुक्रियेनंतर जीवाला प्रबलन मिळते | 4. निरंतर प्रबलन |

**संकेत** :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (A) | P-2 | Q-1 | R-4 | S-3 |
| (B) | P-1 | Q-2 | R-3 | S-4 |
| (C) | P-3 | Q-4 | R-2 | S-1 |
| (D) | P-4 | Q-3 | R-1 | S-2 |

45. Which of the following scaling method/swas/were NOT proposed by L.L. Thurstone ?
    1. Scalogram analysis
    2. Paired comparison
    3. Summated ratings
    4. Equal appearing intervals
    (A) 3 only
    (B) 1 and 2 only
    (C) 1 and 3 only
    (D) 1, 3 and 4 only

46. Which of the following statements are correct ?
    1. Perceived speed of moving object is underestimated when tracked by eyes, than when eyes remain stationery.
    2. Staring at a moving pattern for several seconds can produce slower motion after effect in opposite direction.
    3. Biological motion can be determined accurately with point light displays, even by motion blind patients.
    4. Causality of motion is perceived more accurately with longer time lags or intervals between two movements.
    (A) 1, 2 and 3 only
    (B) 2, 3 and 4 only
    (C) 1, 3 and 4 only
    (D) 1, 2 and 4 only

45. पुढीलपैकी कोणती/कोणत्या मापनी पद्धती एल्. एल्. थर्स्टन यांनी दिली/दिल्या **नाहीत** ?
    1. स्केलोग्रॅम विश्लेषण
    2. युग्म तुलना
    3. समाकलित पदनिश्चयन
    4. समदर्शी अंतराल पद्धती
    (A) 3 फक्त
    (B) 1 व 2 फक्त
    (C) 1 व 3 फक्त
    (D) 1, 3 व 4 फक्त

46. पुढीलपैकी कोणती विधाने खरी आहेती ?
    1. चक्षू अस्थिर असतानाचे वेगाचे संवेदन, चक्षू स्थिर असतानाच्या संवेदनापेक्षा कमी असते.
    2. काही सेकंदाकरता हालत्या रेखाचित्राकडे टक लावून पहात राहिले तर पश्चात प्रभाव उलट्या दिशेने, कमी वेगाने असतो
    3. ज्यांना हालचाली दिसू शकत नाहीत, असे रुग्ण देखील पॉइंट लाइट डिसप्लेच्या आधारे जैविक हालचाल नेमकी ओळखू शकतात
    4. दोन हालचाली दरम्यान कमी वेळ असेल तर हालचालीच्या कारणमीमांसेचे संवेदन जास्त अचूक होते.
    (A) 1, 2 आणि 3 फक्त
    (B) 2, 3 आणि 4 फक्त
    (C) 1, 3 आणि 4 फक्त
    (D) 1, 2 आणि 4 फक्त

www.prepp.in



47. For drawing a frequency distribution, the steps followed are :
   (A) tallies, frequencies, range of scores, class interval
   (B) class intervals, frequency, tallies, range of scores
   (C) frequency, range of scores, class intervals, tallies
   (D) range of scores, class intervals, tallies, frequency

48. When a response is followed by experiencing something pleasurable it is called :
   (A) positive reinforcement
   (B) negative reinforcement
   (C) punishment
   (D) generalization

47. वारंवारता वितरण काढण्यासाठी खालील टप्पे लागतात :
   (A) मेळ, वारंवारिता, गुणविस्तार, वर्गांतर
   (B) वर्गांतर, वारंवारिता, मेळ, गुणविस्तार
   (C) वारंवारिता, गुणविस्तार, वर्गांतर, मेळ
   (D) गुणविस्तार, वर्गांतर, मेळ, वारंवारिता

48. अनुक्रियेपाठोपाठ जेव्हा सुखद अनुभव येतो, तेव्हा त्याला असे संबोधतात :
   (A) धन प्रतिफल
   (B) ऋण प्रतिफल
   (C) शिक्षा
   (D) सामान्यीकरण

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



49. Match the traditional descriptive terms and brain structures from the lists below :

| **List I (Traditional descriptive terms)** | **List II (Structures)** |
|---|---|
| P. Telencephelon | 1. Thalamus |
| Q. Diencephelon | 2. Tectum |
| R. Mesencephelon | 3. Cerebellum |
| S. Metencephelon | 4. Cerebral contex |

**Codes**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (A) | P-1 | Q-4 | R-3 | S-2 |
| (B) | P-2 | Q-3 | R-1 | S-4 |
| (C) | P-3 | Q-2 | R-4 | S-1 |
| (D) | P-4 | Q-1 | R-2 | S-3 |

50. Which one of the following techniques uses a radioactive substance to look at the functioning of the brain ?

(A) EEG

(B) CT

(C) MRI

(D) PET

49. खालील वर्णनपर संज्ञा व संरचनांच्या जोड्या लावा. सूची I व II यांच्या जोड्या लावा आणि खालील संकेतन वापरून उत्तर द्या.

| **सूची I (वर्णनपर संज्ञा)** | **सूची II (संरचना)** |
|---|---|
| P. टेलेन्सेफेलॉन | 1. थॅलेमस् |
| Q. डायेनसेफेलॉन | 2. टेक्टम् |
| R. मीझेनसेफेलॉन | 3. सेरिबेलम् |
| S. मेटेनसेफेलॉन | 4. सेरीब्रल कोर्टेक्स् |

**संकेत :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (A) | P-1 | Q-4 | R-3 | S-2 |
| (B) | P-2 | Q-3 | R-1 | S-4 |
| (C) | P-3 | Q-2 | R-4 | S-1 |
| (D) | P-4 | Q-1 | R-2 | S-3 |

50. खालील कोणते तंत्र रेडिओॲक्टिव्ह पदार्थाचा वापर करून मेंदूच्या क्रियेचा अभ्यास करते ?

(A) ई.ई.जी.

(B) सी. टी.

(C) एम्. आर. आय.

(D) पी. ई. टी.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**ROUGH WORK**

Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in



ROUGH WORK

Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet No. / प्रश्नपत्रिका क्र. **F**

Signature of Invigilators
1. ........................................
2. ........................................

Seat No. [ ] [ ] [ ] [ ] [ ] [ ]
(In figures as in Admit Card)

Seat No. (In words) ............................
.........................................................

# PSYCHOLOGY
## Paper II

**NOV - 13211**

Answer Sheet No. [ ] [ ] [ ] [ ] [ ]

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **28**

### Instructions for the Candidates

1. Write your Seat Number in the space provided on the top of this page. Write your Answer Sheet No. in the space provided for Answer Sheet No. on the top of this page.
2. Write and darken Test Booklet No. on OMR Answer Sheet.
3. This paper consists of **Fifty (50)** multiple choice type of questions.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the responses as indicated below on the correct response against each item.
   **Example :** (A) (B) ● (D)
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items for this paper are to be indicated on the Answer Sheet only. Responses like ( × ) ( ▯ ) ( ✓ ) and **light shaded responses will not be considered/evaluated.**
6. Read instructions given inside carefully.
7. One Sheet is attached at the end of the booklet for rough work.
8. You should return the test booklet and answer sheet **both** to the invigilator at the end of the paper and should not carry any paper with you outside the examination hall.
9. Answers marked on the body of the question paper will not be evaluated.

### परीक्षार्थींसाठी सूचना

1. या पानावरील वरच्या कोपऱ्यात आपला आसन क्रमांक तसेच आपणास दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. प्रश्नपत्रिका क्रमांक OMR उत्तरपत्रिकेवर दिलेल्या रकान्यात लिहून त्याप्रमाणे काळा करावा.
3. या प्रश्नपत्रिकेत **पन्नास** बहुनिवड प्रश्न आहेत.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा करावा.
   **उदा.** (A) (B) ● (D)
   जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेमध्येच द्यावीत. उत्तराच्या रकान्यामध्ये ( × ) ( ✓ ) ( / ) व **अस्पष्टपणे काळे केलेले उत्तर ग्राह्य धरले जाणार नाही.**
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. कच्च्या कामासाठी प्रश्नपत्रिकेच्या शेवटी कोरे पान जोडले आहे.
8. या पेपरची परीक्षा संपल्यानंतर प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका **दोन्ही** पर्यवेक्षकांना परत करावी. यातील कोणताही कागद तुमच्या बरोबर परीक्षा केंद्राबाहेर नेण्यास सक्त मनाई आहे.
9. प्रश्नपत्रिकेवर दर्शविलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.